**प्रेसनोट दि.१३/०९/२०१८**

**"मिसिंग दिड वर्षे मुलाचे आई-वडिलांचा तात्काळ शोध घेवून त्यांचे ताब्यात परत दिले".**

**पो.हवा.५४०८ शिंदे, पो.शि.२३४७ पिसाळ, पो.शि ५८७६ बोराडे, पो.शि.९०५७ लामतुरे यांची कामगिरी**

**खडक पोलीस ठाणे पुणे शहर**

---

दि.११/०९/२०१८ रोजी दुपारी १३.५५ वा. चे सुमारास खडक पोलीस ठाणे अंकीत असलेल्या मिठगंज पोलीस चौकी येथे इसम विशाल दत्ता पाटोळे वय २५ वर्षे,रा.६३३ गंजपेठ,पुणे यांनी त्यांचे सोबत अंदाजे दिडवर्षाचा मुलगा चौकीत आणुन सांगितले की, सदरचा मुलगा एकटाच रोडवरून रडत असताना मिळुन आला, सदर मुलाकडे त्याचे आई-वडिलांबाबत विचारणा केली असता तो कीहीएक बोलत नसल्याचे सांगितले. सदरवेळी मिठगंज पोलीस चौकीमध्ये डयुटी अंमलदार म्हणुन पो.हवा.५४०८ शिंदे व दप्तरी पो.शि. २३४७ पिसाळ हे कर्तव्यावर हजर होते. त्यांनी लागलीच मिठगंज मार्शलवरील पोलीस कर्मचारी पो.शि ५८७६ बोराडे व पो.शि.९०५७ लामतुरे यांना बोलावुन सदर मुलाचा फोटो मोबाईल काढून त्याचे आई-वडिलांचा आजुबाजुच्या परिसरात शोध घेण्यास सांगितला असता, नमुद कर्मचारी यांनी घसेडीपुल,बंदीवान मारूती चौक, टिंबर मार्केट, मासेआळी या भागात शोध घेत महात्मा फुले वाडा परिसरात येवून तेथील नागरिकांना हरविलेल्या मुलाचा फोटो दाखविला असता, त्यांनी सदर मुलास ओळखून तो महात्मा वाडयाचे समोर असलेल्या सार्वजनिक शौचालयाच्या बाजुस राहवयास असल्याचे सांगितले त्यामुळे नमुद कर्मचारी यांनी तेथे जावुन माहिती घेतली असता, इसम मंगरू राजाराम गौतम,वय-२८ वर्षे,धंदा-हमाली,मुळगाव-खेवसीपुर,जि. जैनापुर,राज्य-उत्तर प्रदेश,सद्या रा.महात्मा फुले वाडा,पुणे असल्याचे सांगुन फोटोत दाखविलेला मुलगा त्यांचा असल्याचे सांगितल्याने त्यांनी नमुद पालकांना मिठगंज पोलीस चौकी येथे आणुन त्यांचेबाबत कागदोपत्री खातरजमा व मुलाने त्याचे नातेवाईकांना ओळखल्याने,त्यास सुखरूपपणे वडिलांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**